# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र. ५०५ दिनांक ०९/०६/२०२०

## कासा पोलीस स्टेशन यांचेकडुन पालघर जिल्हयातील जनावरे चोरी करणारी टोळी जेरबंद

दिनांक ०१/०६/२०२० रोजी १५:०० वाजता दाखल असुन सदर गुन्हयातील आरोपीत यांनी दिनांक १८/०५/२०२० रोजी रात्रौ ०२.३० वाजण्याचे सुमारास एका काळया रंगाची स्कार्पिओ गाडी क्रमांक एम.एच. ०४ सी.जे. १५५८ ही मुंबई अहमदाबाद हायवे रोडच्या लगत असलेल्या परिवार हॉटेलच्या आवारात उभी करुन रोडच्या कडेला उभा असलेला काळा रंगाचा बैल स्कार्पिओ गाडीत भरुन चोरी करुन पळून गेलेबाबत दिपक रामदास शेटटी, वय ४३ वर्ष, धंदा हॉटेल, रा. ब-हाणपुर, तुंबडपाडा ता. जि. पालघर यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन कासा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १०१/२०२० भा.द.वि.स.क. ३७९, ३४ प्रमाणे कासा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयातील आरोपीत अशरफ उर्फ पोपट अन्सार पटेल रा.महापोली, ता. भिवंडी जि.ठाणे यास गुन्हयात वापरलेल्या वाहनासह अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान गुन्हयात आणखी इतर ६ आरोपीत यांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झालेले आहे. सदर गुन्हयाचे तपासामध्ये पालघर जिल्हयातील खालील गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.नं. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|---|
| १) | कासा पोलीस ठाणे | ६५/२०२० | भा.द.वि.स.क. ३७९ प्रमाणे |
| २) | कासा पोलीस ठाणे | ९६/२०२० | भा.द.वि.स.क. ३७९ प्रमाणे |
| ३) | वाणगांव पोलीस ठाणे | ३४/२०२० | भा.द.वि.स.क. ३७९, ५११, ३३६, ४२९, ३४ प्रमाणे |

सदरची कामगीरी महिला सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती सिध्दवा जायभाये, कासा पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे अन्वेषण पथाकातील कर्मचारी पोहवा/१६८७ आर.के.चौधरी, पोना/६६५ एन. ए. जनाठे, पोना/२०४७ आर.बी. भोये, पोशि/१९२० वाय. जी. पाटील, पोशि/२५५ बी. के. सोनवणे यांनी केली आहे.